महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २४५ वा | दिनांक : २५/०७/२०२५ | वार : शुक्रवार

## देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते 'जेएनयू'त मराठी अध्यासन केंद्राचे उदघाटन



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राजधानी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र तसेच कुसुमाग्रज मराठी अध्यासन केंद्राचे उद्धाटन करण्यात आले. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत हे देखील यावेळी उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस जेव्हा जेएनयू विद्यापीठात पोहोचले तेव्हा येथील विद्यार्थ्यांनी आंदोलन करत विरोध दर्शवला. महाराष्ट्रात मराठी-हिंदी भाषा वाद सुरू असल्याच्या कारणावरून विद्यार्थ्यांनी निदर्शने केली. एसएफआय विद्यार्थी संघटनेच्या विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

एसएफआय विद्यार्थी संघटनेने कुसुमाग्रज मराठी अध्यासनाच्या उद्धाटनाच्या कार्यक्रमाला विरोध केला. महाराष्ट्रात हिंदी भाषिकांना मारहाण केली जात असल्याच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांनी हे आंदोलन केले. तर दुसरीकडे जेएनयू सारख्या विद्यापीठात मराठी अध्यासन केंद्राचे उद्धाटन झाले हे अभिमानास्पद असल्याची भावना मराठी माणसांकडून व्यक्त केली जात आहे.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठात अनेक भाषांचे अध्यासन केंद्र आहेत. संस्कृतसह परदेशी भाषेचे देखील अध्यासन केंद्रे आहेत. त्यात आता मराठी भाषेचे देखील अध्यासन केंद्राचे उद्धाटन करण्यात आले आहे. 2005-06 पासून या अध्यासनाची मागणी केली जात होती, अखेर आज कुसुमाग्रज मराठी अध्यासन केंद्राचे उद्धाटन करण्यात आले आहे. कुसुमाग्रज मराठी अध्यासन केंद्र तसेच छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे उद्धाटन झाल्यानंतर 'जय जय महाराष्ट्र माझा' हे गीत गाण्यात आले.

उद्धाटन सोहळा पार पडल्यानंतर मराठी भाषा मंत्री उदय सामंत म्हणाले, मला मनापासून आनंद होतो आहे जेव्हा मी दोन महिन्यांपूर्वी आलो होतो तेव्हा मला असे वाटले शांततापूर्ण विद्यापीठाचे कुलगुरू सुद्धा शांततापूर्ण असतील, पण तसे नसून त्यांनी मराठीत बोलून माझे स्वागत केले. तसेच मराठी अध्यासन केंद्रासाठी त्यांनी देखील जास्त पुढाकार घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार सर्वत्र पोहोचवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोतच, पण येथील कुलगुरू यांनी देखील यासाठी पाठपुरावा केला.

छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा हा जेएनयूमध्ये असावा अशी इच्छा मी कुलगुरू यांच्याकडे व्यक्त केली. तेव्हा त्यावर ते म्हणाले, 2 हजार एकर जमीन आहे जिथे उभा करायचा तिथे करू, असे आश्वासन त्यांनी दिले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना धन्यवाद देईल. कुसुमाग्रज यांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरू होत आहे. आज मराठी भाषेचा मंत्री म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की काश्मीरमध्ये देखील पुस्तक गाव तयार करण्यात येणार आहे. मराठीचे अध्यासन केंद्र सुरू होत असताना येथील मराठी विद्यार्थ्यांचा टक्का देखील वाढला पाहिजे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज खरोखर अतिशय आनंदाची गोष्ट आहे की या विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराजांच्या सामरिक शक्तीचा आविष्कार आणि त्याचे अध्यापन करण्याचे काम सुरू होत आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे की शिवाजी महाराजांच्या युद्ध नीतीचा जगभरात अभ्यास केला जातो. तसेच शिवरायांचे 12 किल्ले यूनेसकोने जागतिक वारसाचा दर्जा दिला आहे. सह्याद्रीच्या घाटात, दर्या खोऱ्यात एक एक जागा अशी निवडली आहे की किल्ल्याला अभेद्य बनवते. कितीही बलाढ्य शत्रू आला तरी हे किल्ले जिंकू शकणार नाहीत, अशी ही किल्ल्यांची रचना आहे. याचा देखील अभ्यास केला जाणार आहे. छत्रपती शिवराय येणारे संकट ओळखत होते आणि म्हणूनच त्यांनी समुद्री किल्ले जे बांधले आहेत, आज इतक्या वर्षांनी देखील त्याला भेग जात नाही. हे किल्ले जसेच्या तशे आहेत. इंग्रज असतील, पोर्तुगीज असतील या सर्वांना छत्रपतींच्या परवानगी शिवाय येऊ दिले जात नव्हते. ही त्यांची दूरदृष्टी होती.

छत्रपती शिवाजी महाराज हे लढाई कुठे झाली पाहिजे त्याचे योग्य नियोजन करून शत्रूला तिथे गाठण्याची रणनीती आखायचे. आपण त्यांना दैवत मानतो. त्यांनी बलाढ्य शत्रूला नमवले आणि स्वराज्याची स्थापना केली. आपल्याला माहीत आहे की साडे तीनशे किल्ले आपल्याकडे होते. एकदा शिवाजी महाराज असे म्हणले होते की प्रत्येक किल्ल्यात आपण शत्रूला झुंजवत ठेवले तर 10 औरंगजेब आले तरी आपल्याला कोणी हारवू शकणार नाही. अशी अभेद्य व्यवस्था त्यांनी करून ठेवली आहे. त्यांनी लोक सुद्धा अगदी पारखून निवडले होते. त्यांच्या नंतर छत्रपती संभाजी महाराजांनी मोठी झुंज दिली. औरंगजेबची कबर तयारी झाली पण स्वराज्य कधी संपले नाही.

## राज्याच्या मंत्रिमंडळात फेरबदल होणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**पंढरपूर :** महाराष्ट्रात सध्या आमदारांचे अनेक व्हिडिओ समोर येत आहेत. कोणी मारामारी करत आहे, तर कोणाच्या घरात पैशांनी भरलेली बॅग दिसून येत आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे विधिमंडळात मोबाइलवर रम्मी खेळतानाचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला. यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळात फेरबदल होणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सूचक विधान केले आहे.

पंढरपूर येथे एकनाथ शिंदे यांना संत नामदेव महाराज यांच्या नावे पुरस्कार जाहीर झाला. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी सध्याच्या राजकारणावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, आम्ही टीम म्हणून काम करत आहोत. पद खाली वर होत असतात, असे म्हणत त्यांनी मंत्रिमंडळात फेरबदल होणार असल्याच्या चर्चांवर सूचक विधान केले आहे. तसेच पुढे बोलताना ते म्हणाले, चांगले काम करण्याचा सरकारचा अजेंडा आहे. आमचा अजेंडा खुर्ची नाही, खुर्चीत ज्यांनी बसवले त्यांचे प्रश्न सोडवणे हा आमचा अजेंडा आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आम्ही सारे एकत्र आहोत, असे शिंदे यांनी म्हटले.

यावेळी पत्रकारांनी लाडकी बहीण योजनेमुळे सरकार अडचणीत येत आहे का? असा सवाल केला. यावर उत्तर देताना एकनाथ शिंदे म्हणाले, असे काहीही नाही. एसटी महामंडळाने एकत्र बूकिंगवर 30 टक्के वाढ केली होती. त्याबद्दल मी सकाळीच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी बोललो आहे. त्यांनी जी काही वाढ केली आहे ती रद्द करण्यास सांगितले आहे.

## टक्केवारीवाल्या राजकारणाने शेतकऱ्यांनंतर आता ठेकेदार आत्महत्या करू लागले



**सांगली :** वाळवा तालुक्यातील तांदुळवाडी गावातील जल जीवन मिशनसाठी काम करणाऱ्या 35 वर्षीय ठेकेदार हर्षल पाटील यांनी बिले वेळेवर न मिळाल्यामुळे आत्महत्या केल्याचा हृदयद्रावक प्रकार उघडकीस आला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी व पाच वर्षांची मुलगी असा परिवार असून, या घटनेने कंत्राटदारांमध्ये संतापाचा आणि असुरक्षिततेचा सूर उमटला आहे.

या प्रकरणावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, सामान्य जनतेचा बळी घेऊन तुम्ही जो बेधुंद कारभार चालवला आहे, तो आता शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपासून ठेकेदारांच्या आत्महत्यांपर्यंत पोहोचला आहे. ही तुमच्या कर्माची फळं सामान्य जनता भोगत आहे असे म्हणत त्यांनी फडणवीस सरकारवर टीकास्त्र डागले आहे.

राजू शेट्टी पुढे म्हणाले की, गेल्या दीड-दोन वर्षांपासून ठेकेदारांनी कामे करूनही त्यांना बिले मिळत नाहीत. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती दयनीय झाली आहे. अनेक कुटुंबं उध्वस्त झाली आहेत. हर्षल पाटील हे त्याचे ताजं उदाहरण आहे. एका चुणचुणीत बापाचं लेकरू, एका पत्नीच्या कपाळचं कुंकू, एका पित्याचं आधारवड... तुमच्या धोरणांमुळेच हे सर्व उद्ध्वस्त झाले आहे.

राजू शेट्टी पुढे म्हणाले की, शक्तिपीठ महा मार्गासाठी 20 हजार कोटींचे कर्ज घेऊन 86 हजार कोटींचा रस्ता बांधण्याचे खूळ तुमचे सरकार करत आहे, पण ज्या ठेकेदारांनी प्रत्यक्ष काम केले त्यांना पिळवटून टाकत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया शेट्टींनी दिली आहे.

राजू शेट्टी पुढे म्हणाले की, हर्षल पाटील यांची आत्महत्या ही केवळ एक घटना नसून, संपूर्ण राज्यातील सरकारी ठेकेदारांची परिस्थिती किती बिकट झाली आहे, याचे द्योतक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राज्य सरकारने कंत्राटदारांचे थकीत बिले तत्काळ द्यावीत आणि नव्याने अशी दुःखद प्रकरणं होऊ नयेत, अशी मागणी त्यांनी केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ जुलै २०२५


## वेरूळ ते दौलताबाद टी पॉइंट घाटातील मार्ग श्रावण सोमवार शनिवार बंद





**खुलताबाद : (प्रा. योगेश रावते)** शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या श्रावण महिन्यामध्ये प्रत्येक शनिवारी खुलताबाद येथील श्रीभद्रामारोती तसेच सोमवारी वेरुळच्या श्री घृष्णेश्वर मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविकांची गर्दी असते. शनिवारी भद्रामारोतीला हजारोंच्या संख्येने रस्त्याने पायी जाण्याची प्रथा आहे. तसेच सोमवारी वेरुळ येथील घृष्णेश्वर दर्शनासाठी तसेच तीर्थकुंडातील पाणी ( तीर्थ ) कावडीद्वारे अनेक ठिकाणी भाविक पायी घेऊन जातात. त्या पार्श्वभूमीवर शहर तसेच वाहतूक पोलिसांनी या दिशेने जाणाऱ्या वाहतुकीत मोठे बदल केले आहे. वेरुळच्या दिशेने जाणाऱ्या सर्व मार्गावरील दि.२४ जुलै ते २३ ऑगस्ट दरम्यान सर्व प्रकारची जड वाहतूक बंद करण्याचे आदेश पोलिस अधीक्षकांनी दिले आहेत.तसेच प्रत्येक शुक्रवारी सायंकाळी ६ ते शनिवारी मध्यरात्री १ वाजेपर्यंत दौलताबाद टी पॉईंट ते खुलताबादच्या दिशेने जाणारा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहणार असल्याचे शहर वाहतूक विभागाचे सहाय्यक निरीक्षक सचिन मिरधे यांनी सांगितले.हा असेल पर्यायी मार्गछत्रपती संभाजीनगरकडूननाशिक, धुळ्याकडे जाणारी जड, मध्यम वाहने भगवान महावीर चौक (बाबा पंप चौक), नगरनाका, एस. एस. क्लब, करोडीमार्गे सोलापूर-धुळे महामार्गावरून जांभाळा कसाबखेडा फाटा वेरुळमार्गे ये जा करतील .तर नाशिक, धुळ्यावरून शहरात येणारी मध्यम व जड वाहने कसाबखेडा फाटा, करोडी, ए.एस. क्लबमार्गे शहरात येतील.खुलताबाद मार्ग खालील तारखांना बंद२५ जुलै ते २३ ऑगस्ट या काळात प्रत्येक शुक्रवारी सायंकाळी ६ ते शनिवारी रात्री १ वाजेपर्यंत नगरनाका ते दौलताबाद टी पॉईंटमार्गे मध्यम व जड वाहनांसाठी बंद राहील. तर दौलताबाद टी पॉईंट ते दौलताबाद घाटमार्गे पुढे खुलताबादच्या दिशेचा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद करण्याची सूचना पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिले.

## किनगाव राजा येथे श्री संत गजानन महाराज दिंडीचे उत्साहात आगमन





**कीनगाव राजा** — (महेश मुंढे) श्री संत गजानन महाराज शेगाव संस्थानच्या पवित्र दिंडीचे मोठ्या उत्साहात व श्रद्धेने स्वागत करण्यात आले. संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.गजानन महाराजांची दिंडी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शेगावहून निघाली असून, ती जिल्ह्यातील विविध गावांमधून होते आहे. किनगाव राजा येथे दाखल होताच फुलांची उधळण, ढोल-ताशांच्या गजरात व बँडच्या निनादात दिंडीचे स्वागत करण्यात आले. गावातील महिला, युवक आणि वयोवृद्धांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला.यावेळी स्थानिक मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. भजन, कीर्तन व महाप्रसादाचा कार्यक्रम देखील पार पडला. गावातील विविध मंडळांनी सजावट व आरास करून दिंडीचे स्वागत केले.दिंडीमुळे गावात भक्तिभाव वाढला असून, संत गजानन महाराजांचा जप करत संपूर्ण वातावरण भक्तिरसात न्हाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## टाटा बिल्डकॉम स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश




**दौलताबाद (जावेद अहमद)** : स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज आसेगाव येथील विद्यार्थ्यांनी टिसीएस मार्फत घेण्यात आलेल्या टाटा बिल्डिंग इंडिया निबंध स्पर्धेत वैष्णवी सुरासे , आदित्य पऱ्हाड , सृष्टी उबाळे, आरुषी जाधव,भक्ती नवले, भक्ती मते, हिमानी शेळके, रितेश प्रधान या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. तसेच या यशाबद्दल विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. यावेळी शाळेचे संचालक रत्नाकर फाळके ,.गीता फाळके , प्राचार्य योगेश फाळके , टीसीएस अधिकारी तथा संयोजक शिंदे सर, शिक्षक योगेश तंटक, नागेश लिंगायत, सोहेल शेख, दुर्गेश कामथे, सत्यजित पवार ,सागर मुगले ,परमेश्वर उबाळे शिक्षिका अनिसा शेख, अर्चना थळपती, नम्रता थोरात, वैशाली बोर्डे, आसमा पठाण, शोभा नागरे, सविता राजगुरू, सुनिता बहुरे, सुनिता वायाळ,वर्षा काळवणे, अश्विनी जाधव, पुजा कावडे, सोनम मिस, ज्ञानेश्वरी देवचे, सपना कुल्हाळ, सुनिता त्रिभुवन, सुनिता सूर्यवंशी ते ज्ञानेश्वरी मॅडम देवचे होते , प्रणिता जोशी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या यशाबद्दल वि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ जुलै २०२५


## शेतकरी दांपत्याने एकाच झाडाला गळफास लावत संपवली जीवन यात्रा



**बुलढाणा** : राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा एक गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून अनेक शेतकरी आपले जीवन संपवत आहेत. याच पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, अशी मागणी विरोधी पक्ष आणि विविध शेतकरी संघटनांकडून सातत्याने केली जात आहे. प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनीही याच मागणीसाठी आंदोलन सुरू केले आहे. अशातच, बुलढाणा जिल्ह्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे.

एका शेतकरी दाम्पत्याने आपल्याच शेतात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेने पुन्हा एकदा राज्यातील शेतकऱ्यांची बिकट अवस्थेवर प्रकाश टाकला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातल्या भरोसा गावात गणेश थुट्टे (वय ५५) आणि त्यांच्या पत्नी रंजना थुट्टे (वय ५०) या शेतकरी दांपत्याने आपल्या शेतातील निंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. पती-पत्नीचे मृतदेह शेजारी-शेजारीच एकाच झाडाला लटकलेले पाहून संपूर्ण गाव सुन्न झाले असून, परिसरात शोककळा पसरली आहे.

थुट्टे दांपत्याने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, शेतीत सातत्याने होणारे नुकसान आणि हुमणी अळीमुळे पिकांवर आलेले संकट, यामुळे ते आर्थिक विवंचनेत होते अशी चर्चा गावात सुरु आहे. याच नैराश्यातून त्यांनी हे धक्कादायक पाऊल उचलल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

पाऊस सुरू असतानाच ही हृदयद्रावक घटना उघडकीस आली, त्यामुळे अंढेरा पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृत पती-पत्नीचे पार्थिव झाडावरून खाली उतरवून शवविच्छेदनासाठी पाठवले आहे. या घटनेमागील नेमके कारण शोधण्यासाठी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## शिवाजी महाविद्यालयात एकदिवसीय अग्निवीर कार्यशाळा संपन्न



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : 19 जुलै रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभाग व 53 महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय अग्निवीर कार्यशाळा घेण्यात आली . कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले हे होते . त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अग्निवीर भरती बदल विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, शारीरिक , मानसिक, बौद्धिकतेकतेची तयारी करूण चांगले अध्ययन करून भरतीची तयारी करावी असे सांगितले . धाराशिव जिल्ह्यात शिवाजी महाविद्यालय एकमेव असे आहे जे की अकरावीच्या मुलांना, मुलींना एनसीसी मध्ये प्रवेश देऊन त्यांना त्याबदलचे परिपूर्ण शिक्षण देऊन कॅडेटसची योग्य ती तीन वर्षाच्या कालखंडात तयारी करून घेते. तरुणांनी भरती होऊन देशाची सेवा करावी असे सांगितले . कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक नायब सुभेदार बाजीराव पाटील यांनी अग्निवीर भरती कोणत्या उदेश्याने ही योजना भारत सरकारने सुरु केली त्या मागचा इतिहास काय कारण अग्निवीर योजनेचा कार्यकाल हा चार वर्षाचाच आहे या कार्यकाळात त्यांच्या वेगवेगळ्या परीक्षा घेऊन तो किती सक्षम आहे व तो सेवेत कायम ठेवायचा कि नाही याबदल किती जणांना सेवेत ठेवायचे सेवा पूर्ण झाल्या नंतर त्या युवकांना रोजगाराची शासणानी कोणत्या क्षेत्रात त्यांना नौकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत त्याबदलचे अतिशय सखोल अशी माहिती या कार्यशाळेतुन विद्यार्थ्यांना देण्यात आली . अग्निवीर भरती साठी लागणारी सर्व कागदपत्रे, पात्रता, अटी शारीरिक ,मैदानी, शैक्षणिक, सैन्य दलातील वेगवेगळी पदे व बढती, पदोन्नती या बदल विद्यार्थी व कॅडेटसना संपूर्ण असे मार्गदर्शन केले एनसीसीचे बी व सी प्रमाणपत्र पूर्ण केल्या नंतर त्याचा सैन्य दलात होणारे फायदे या बदलची माहिती या कार्यशाळेतुन देण्यात आली . अग्निवीर योजनेचा सर्वांनी फायदा घ्यावा असे यावेळी पाटील सरांनी सांगितले या कार्यशाळेत एकुण 120 कॅडेटस उपस्थित होते. कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी प्रास्ताविक, कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कॅडेट वैष्णवी कांबळे आभार कॅडेट भूमिका शेंडगे हिने केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीमध्ये हवलदार सुभेदार काळे सुनिल , डॉ भरत शेळके भारत विद्यालयाचे संदिप चव्हाण सर्व कॅडेटस, प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .

## नागपुरात घरकाम करणाऱ्या महिलेची हत्या



**नागपूर** : माया मदन पसेरकर (५८) यांचा अज्ञात हल्लेखोराने गळा कापून खून केला. भरदिवसा घडलेल्या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण होते. बर्डी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जवाहरलाल नगर शाळेजवळील इंदिरा नगर कॉन्व्हेंटच्या परिसरात ही घटना घडली. पसेरकर एका बंगल्यात घरकाम करायची. तिला कोणी आणि का मारले? हे गूढ कायम आहे. या घटनेबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. महिलेचा पाठलाग करणाऱ्या एका तरुणाचे छायाचित्र सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. महिलेचा पाठलाग करणाऱ्या तरुणाने हा गुन्हा केला असावा असे म्हटले जात आहे. तो जिथून आला होता त्याच दिशेने पळून गेला.

हा तरुण महिलेचा पाठलाग कुठून करीत होता हे शोधण्यासाठी सीताबर्डी पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. घटनेनंतर परिसरात घबराटीचे वातावरण आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये प्रथम काळ्या कपड्यातील एक तरुण हातमोजे घालून महिलेच्या मागे चालताना दिसतो, त्यानंतर दुसऱ्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये लाल टी-शर्ट घातलेला एक तरुण तिच्या मागे जाताना दिसतो, त्यानंतर ती महिला झाडामागे पोहोचल्यावर तो बेफामपणे मागे पळताना दिसतो.

हत्येचे कारण अद्याप उघड झालेले नाही आणि पोलिसांनी कोणत्याही संशयिताला अटक केलेली नाही. मायाची हत्या काही शत्रुत्वातून झाली आहे की इतर काही कारण आहे याचा तपास सीताबर्डी पोलिसांनी सुरू केला आहे. सीताबर्डी पोलिस आणि गुन्हे शाखेचे पथक आता प्रत्येक कोनातून तपास करत आहेत. कौटुंबिक वाद, मालमत्तेचा वाद किंवा जुने वैमनस्य असो, पोलीस हत्येमागील कारण शोधण्यात व्यस्त आहेत. मृत महिला घरकाम करायची त्या बंगल्यांचाही तपास केला जात आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ जुलै २०२५


## बालरंगभूमी परिषदेतर्फे २ ऑगस्ट मराठी बालनाट्य दिवस म्हणून साजरा होणार

**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची संलग्न संस्था बालरंगभूमी परिषद या संस्थेतर्फे २ ऑगस्ट हा दिवस मराठी बालनाट्य दिवस म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. २ ऑगस्ट १९५९ रोजी स्व. रत्नाकर मतकरी लिखित स्व. सुधाताई करमरकर दिग्दर्शित मधुमंजिरी या मराठी बालनाट्याचा प्रयोग व्यावसायिक स्तरावर झाल्याची नोंद असल्याकारणाने बालरंगभूमी परिषदेतर्फे २ ऑगस्ट हा दिवस मराठी बालनाट्य दिवस म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले आहे. यानिमित्ताने मराठी भाषेचा प्रसार व प्रचार या उद्देश सहित छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यां करिता अभिनय स्पर्धा आयोजित केली आहे. ही स्पर्धा शालेय स्तरावर इयत्ता १ ली ते ४ थी , इयत्ता ५ ली ते ७ थी आणि इयत्ता ८ वी ते १० वी या तीन गटात होणार असून सदर स्पर्धे करिता कोणतेही शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणार नाही. अभिनय स्पर्धेची भाषा ही फक्त मराठी आहे. स्पर्धेत सहभागी इच्छुकांनी aurangabadbalrangbhoomi@gmail.com या ईमेलवर ३० जुलै २०२५ पर्यंत फॉर्म भरून पाठवावा फॉर्म पाठवू शकतात. बाहेर गावावरून येणाऱ्या स्पर्धकांना स्वखर्चाने प्रवास करावा लागेल. सादरीकरणाचा विषय लहान मुलांच्या जीवनाशी, भावभावनांशी निगडित असावा. स्पर्धक विद्यार्थ्यांना महापुरुषांचे बालवयातील प्रसंग उभे करता येईल. स्पर्धकांना बालनाट्यातील संवाद, प्रसंग सादर करता येईल. रंगभूषा, वेशभूषा, पार्श्वसंगीत यांचा वापर करू शकता. ही स्पर्धकांना स्पर्धेच्या ठिकाणी दिलेल्या वेळेवर दिलेल्या वेळेत सादरीकरण करावे. परीक्षकांचा निकाल अंतिम राहील स्पर्धे बाबत फेरबदल करण्याचा अधिकार संयोजकाकडे राखीव राहील. सहभागी सर्व स्पर्धकांना त्यांचा हुरूप वाढवण्या करिता प्रमाणपत्र देण्यात येते. प्रवेशिका जास्त प्राप्त झाल्यास स्पर्धा ही २ आणि ३ ऑगस्ट रोजी संपन्न होईल. स्पर्धेत सादरीकरण करणाऱ्या सर्वोत्तम स्पर्धकास गटनिहाय पारितोषिक स्पर्धा संपल्यानंतर प्रदान करण्यात येतील. स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे याकरिता स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी अर्चना देवधर 9422285590, संतोष कुलकर्णी 9923244330, राम झिंजुर्डे 7350833883 यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन बालरंगभूमी परिषद छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

## पीओपी मूर्तीवरील बंदी उठल्यानंतर नवी चिंता



**नागपूर :** पर्यावरणवादी कार्यकर्ते डॉ. विजय घुगे व संजयजी सराफ यांच्या संकल्पनेतून "पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२५ व आपली भूमिका' या विषयावर नागपूर महानगरातील विविध स्वयंसेवी संस्थांची ओनलाईन बैठक घेण्यात आली. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार हे बुधवार २३ रोजी पीओपी मूर्ती विसर्जनाचे धोरण जाहीर करणार आहे. तत्पूर्वी त्यांना निवेदन देण्याचे ठरल्याची माहिती घुगे यांनी दिली.

१९९७ पासून शहरातील विविध संघटना-व्यक्तींना सोबत घेऊन पर्यावरणपूरक उत्सवाच्या चळवळीला सुरवात केली. होळी, दिवाळी, गणेशोत्सव ई. त्याला बऱ्यापैकी यशही आले. १५ वर्षांपासून नागपूर जिल्हा पीओपी मूर्ती कारखाना मुक्त झाला. या चळवळीत सुरेश पाठक यांच्या हस्तशिल्पी बहुद्देशीय संस्थेने बहुमूल्य भूमिका पार पाडली व अजूनही या दिशेने सर्व पातळीवर त्यांचे मार्गक्रमण सुरु आहे. परंतु ९ जुलैच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाने पीओपीवरील बंदी उठवण्यात आल्याने १५ वर्षांपूर्वीची परिस्थिती व समस्या निर्माण झाली आहे. यावर तोडगा काढण्यासाठी शेलार यांना निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सुरेश पाठक यांनी या चळवळीची संक्षिप्त पार्श्वभूमी स्पष्ट केली. २००२ पासून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या मोहिमेची विविध उपक्रमाच्या माध्यमातून सुरूवात केली. तत्कालिन महापौर अनिल सोले यांच्या कार्यकाळात २०११ ला पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी अधिसूचना तयार केली. २०१३ ला नगरविकास मंत्रालयाने मंजुरी प्रदान केली असे पाठक यांनी सांगितले.

पीओपी हे घातक असून कोणत्याही नैसर्गिक जलस्तोत्रात विसर्जनास मनाई आहे, अमोनियम बाय कारबोनेट पाण्यामध्ये विरघळने अत्यंत घातक आहे, समुद्रात जलीय जीव व वनस्पती नाहीत अशा दूर ठिकाणी विसर्जन करता येईल, ओहटीच्या दिवशी काठावर आलेल्या मूर्तीची विल्हेवाट लावावी, रिकॅल्शिनेशन करावे. (गोळा केलेल्या पीओपी मूर्तीची भुकटी करून तिला ६०० ते ९०० तापमनावर प्रक्रिया करून बांधकाम उद्योगात उपयोगात आणता येइल) ई. उपाय सुचविले आहेत. ९ जुनला राज्यसरकारने पीओपी मूर्ती निर्मितीवरील बंदी उठवत विसर्जनाची व्यवस्था करण्याचे शपथपत्र दाखल केले. आता फक्त २३ तारखेला विसर्जनाचे धोरण राज्यसरकार न्यायालयात सादर करणार आहे. पीओपी समर्थकांचे लाड पूरविण्याच्या हेतूने आपला इगो जपण्यासाठी राज्यसरकार पुरस्कृत, राजकीय हेतूने प्रेरित गणेशोत्सवामुळे धर्म, संस्कृती, पर्यावरण, कला व रोजगाराची समस्या ऐरणीवर आल्याची टिका पाठक, घुगे, सराफ यांनी केली आहे.

अभिषेक गावंडे यांनी प्रदुषण टाळण्यासाठी प्रत्येकाने घरी वैयक्तिक पितळेची मूर्ती स्थापना करावी, अशी सूचना केली. प्रफुल्ल टापले यांनी पीओपी मूर्ती मार्केटमध्ये येऊ न देणे, त्यांची आयात थांबविणे, सार्वजनिक गणेश मंडळाशी समन्वय साधून त्यांना पर्यावरणपूरक गणपती स्थापन करण्याचा आग्रह करण्यावर भर दिला.

## सरकारी कर्मचाऱ्यांना ३० दिवसांची रजा घेता येईल



**नवी दिल्ली :** केंद्रीय कर्मचारी त्यांच्या वृद्ध पालकांची काळजी घेण्यासाठी 30 दिवसांची रजा घेऊ शकतात. ही तरतूद इतर कोणत्याही वैयक्तिक कारणासाठी देखील लागू होते. केंद्रीय कार्मिक राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी गुरुवारी राज्यसभेत ही माहिती दिली.

सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या वृद्ध पालकांची काळजी घेण्यासाठी रजा घेण्याची काही तरतूद आहे का, असे विचारण्यात आले. तेव्हा त्यांनी लेखी उत्तरात सांगितले की, 'केंद्रीय नागरी सेवा (रजा) नियम, 1972 अंतर्गत, केंद्रीय कर्मचाऱ्यांना 30 दिवसांची अर्जित रजा मिळू शकते.'

याशिवाय, दरवर्षी 20 दिवसांची अर्धवेतन रजा, 8 दिवसांची प्रासंगिक रजा आणि दोन दिवसांची मर्यादित रजा देण्याची तरतूद आहे. या रजांव्यतिरिक्त, सरकारी कर्मचाऱ्यांना पूर्व-निर्धारित सुट्ट्या मिळत राहतील, ज्यासाठी ते पात्र आहेत.

सभागृहात दुसऱ्या एका प्रश्नाचे उत्तर देताना जितेंद्र सिंह म्हणाले की, केंद्र सरकारमध्ये रिक्त पदांची निर्मिती आणि भरती ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे, जी विविध विभाग आणि मंत्रालयांच्या गरजांवर अवलंबून असते.

त्यांनी राज्यसभेत सांगितले की, 1 मार्च 2021 रोजी केंद्र सरकारच्या सर्व मंत्रालये आणि विभागांमध्ये एकूण मंजूर पदांची संख्या 40,35,203 होती. जितेंद्र सिंह यांना सरकारी विभागांमध्ये, विशेषतः रेल्वे, संरक्षण, गृह मंत्रालय आणि टपाल विभागातील एकूण मंजूर पदे आणि रिक्त पदांची माहिती देण्यास सांगण्यात आले.

यापूर्वी, केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी 3 एप्रिल रोजी लोकसभेत सांगितले होते की, केंद्राने अवयवदानावर सरकारी कर्मचाऱ्यांना 42 दिवसांची विशेष कॅज्युअल रजा देण्याची तरतूद केली आहे.

ही रजा शस्त्रक्रियेच्या प्रकारावर अवलंबून राहणार नाही आणि सरकारी डॉक्टरांच्या शिफारशीनुसार जास्तीत जास्त 42 दिवसांसाठी मिळू शकते. ती सहसा रुग्णालयात दाखल होण्याच्या दिवसापासून सुरू होईल, परंतु गरज पडल्यास शस्त्रक्रियेच्या एक आठवडा आधी देखील मिळू शकते.

ही तरतूद कार्मिक मंत्रालयाच्या आदेशानुसार 2023 मध्ये लागू करण्यात आली होती, ज्यामुळे अवयवदानाला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे.

•**आरोग्य सुविधा:** CGHS (केंद्रीय सरकार आरोग्य योजना) अंतर्गत, सरकारी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना स्वस्त दरात उपचार, औषधे आणि रुग्णालयात दाखल करण्याच्या सुविधा मिळतात. निवृत्तीनंतरही CGHS सुविधांचा लाभ घेता येतो.

•**वैद्यकीय रजा आणि मातृत्व लाभ:** महिलांना 6 महिने प्रसूती रजा आणि पुरुषांना 15 दिवसांची पितृत्व रजा दिली जाते. गंभीर आजार किंवा अपघात झाल्यास दीर्घ वैद्यकीय रजा सुविधा.

•**पेन्शन आणि ग्रॅच्युइटी:** सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर पेन्शन, ग्रॅच्युइटी आणि पीएफ (प्रॉव्हिडंट फंड) ची सुविधा मिळते. नवीन पेन्शन योजनेअंतर्गत (एनपीएस) दरमहा पगारातून काही पैसे कापले जातात, जे निवृत्तीनंतर पेन्शन म्हणून दिले जातात.

•**गृहनिर्माण आणि प्रवास लाभ:** सरकारी कर्मचाऱ्यांना एलटीसी (रजा प्रवास सवलत) अंतर्गत दर 4 वर्षांनी एकदा हवाई/रेल्वे प्रवासावर सवलत मिळते. सरकारी निवासस्थान किंवा घरभाडे भत्ता (एचआरए) ची सुविधा दिली जाते.

•**मुलांसाठी शिक्षण आणि शिष्यवृत्ती:** कर्मचाऱ्यांच्या मुलांना त्यांच्या अभ्यासासाठी शिष्यवृत्ती आणि शिक्षण भत्ता दिला जातो. सरकारी कर्मचाऱ्यांच्या मुलांना केंद्रीय विद्यालयांमध्ये प्रवेश घेताना प्राधान्य दिले जाते.

•**विशेष सुट्ट्या आणि फेस्टिवल ॲडव्हान्स:** सरकारी कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय आणि राजपत्रित सुट्ट्यांव्यतिरिक्त अनेक विशेष सुट्ट्या मिळतात. सणांच्या काळात ॲडव्हान्स कर्ज बिनव्याजी घेण्याची सुविधा आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिंग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103